**Maharashtra Water Resources Regulatory Authority**

4/19 Authority Meeting
March 11, 2019; Time 3:30 Hrs.

**MINUTES**

4/19 प्राधिकरणाची बैठक दि .११/०३/२०१९ रोजी दुपारी ३:०० वा. श्री. के.पी. बक्षी, अध्यक्ष मजनिप्रा यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीस पुढीलप्रमाणे उपस्थिती होती.

➢ सदस्य

१) श्री. विनोदकुमार तिवारी – सदस्य ( विधी )
२) श्री. एस.टी सांगळे – सदस्य ( अर्थ )

➢ अधिकारी

१) श्री. रसिक चौहान – सचिव
२) श्रीमती. नसीमा शेख – रजिस्ट्रार

अध्यक्ष महोदय यांनी मंजूर केलेली कार्यसूची चर्चेकरिता बैठक ठेवण्यात आली. ती पुढीलप्रमाणे :-

विषय क्र. १ :- दि. ०८/०१/२०१९ रोजी झालेल्या ३/१९ या बैठकीचे कार्यवृत्तांत कायम करण्याबाबत.

ठराव : बैठकीत ३/१९ हा कार्यवृत्तांत वाचून दाखविण्यात आले व प्राधिकरणाने एकमताने ते कायम केले.

विषय क्र. २ :- महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या आस्थापनेवर वरिष्ठ संचालकाचे पद पुन:स्थापित करणेबाबतचा प्रस्ताव

ठराव : उपरोक्त विषयावर सविस्तर चर्चा झाली व 'वरिष्ठ संचालक' या पदाची मजनिप्रा या कार्यालयास आवश्यकता असल्याने पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव क्र. ३२:- ज्याअर्थी शासन निर्णय संकीर्ण – २००५ (१४९/०५ ) एल.बी. १ / जसंअ, दि. ११/११/२००५ अन्वये, मंत्रिमंडळ व उच्चस्तरीय समितीच्या मान्यतेने वरिष्ठ संचालक हे पद इतर पदासह निर्माण केले होते;

व पुढे ज्याअर्थी सदर 'वरिष्ठ संचालक' हे पद मजनिप्रा (सेवाप्रवेश आणि कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या शर्ती) विनियम, २०१३ या विनियमाद्वारे उपसंचालक ( भूजल ) म्हणून पदावनत केले आहे.

HELD AT ON TIME

तथापि, ज्याअर्थी 'वरिष्ठ संचालक' ( वेतनश्रेणी ३७,४०० - ६७,००० ग्रेड पे ८,९००/- )या पदाची मजनिप्रा च्या आस्थापनेवर कामाच्या वाढत्या प्रमाणामुळे आवश्यकता भासत आहे.

त्याअर्थी उपसंचालक (भूजल) हे पद 'वरिष्ठ संचालक' ( वेतनश्रेणी ३७,४०० - ६७,००० ग्रेड पे ८,९००/- ) या पदामध्ये पुन:स्थापित करण्याचा व विनियमात दुरूस्ती करण्यासाठी तसा प्रस्ताव शासनास स्वतंत्रपणे पाठविण्याचा ठराव पारित करण्यात येत आहे.

ठराव क्र.३३ :- उपरोक्तप्रमाणे पुन:स्थापित केलेल्या 'वरिष्ठ संचालकाच्या' ( वेतनश्रेणी ३७,४०० - ६७,००० ग्रेड पे ८,९००/-) पदावर योग्य अधिकाऱ्याची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्याचा प्रस्ताव शासनास पाठविण्याचा ठराव पारित करण्यात येत आहे.

ठराव क्र. ३४:- उपसंचालक (भूजल) या पदाची सुरू केलेल्या भरतीप्रक्रीयेबद्दल मा. अध्यक्ष व सचिव यांनी स्वतंत्रपणे निर्णय घ्यावा.

**Sub No. 3:- Revised Memorandum of Understanding Between MWRRA and India Institute of Technology Bombay.**

Revised Draft Memorandum of Understanding between MWRRA and Indian Institute of Technology Bombay was placed before authority is approved by the Authority

उपरोक्त बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले. अध्यक्षांचे आभार मानून बैठक समाप्त झाली.

( के. पी. बक्षी )
अध्यक्ष, मजनिप्रा.

CHAIRMAN'S INITIAL